केंद्र शासनाच्या “PCPNDT, ART आणि Surrogacy” कायद्याच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा स्थापित करण्याबाबत अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रचिनी-३१२६/ई.ऑ.क्र. १७७९३३५/प्र.क्र.६५/कु.क.२

१० वा मजला, बी विंग, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई- ४०० ००१
दिनांक:- ०४ ऑगस्ट, २०२६.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाच्या गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ व सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा २०२१ आणि सरोगसी (नियमन) कायदा २०२१ या कायद्याची अंमलबजावणी करताना काही अडचणी निर्माण होत आहेत. तसेच काही गैर प्रकार घडत असल्याच्या घटना आढळून येत आहेत. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे राबवली जात नसल्याने गैर प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे. याकरीता राज्य शासनाचा प्रभावी कायदा अस्तित्वात आणणे आवश्यक असल्याने नवीन कायदा तयार करण्यासाठी अभ्यास समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

केंद्र शासनाच्या गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ व सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा २०२१ आणि सरोगसी (नियमन) कायदा २०२१ या कायद्याची अंमलबजावणी करताना काही अडचणी निर्माण होत आहेत. तसेच काही गैर प्रकार घडत असल्याच्या घटना आढळून येत आहेत. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे राबवली जात नसल्याने गैर प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकरणामध्ये आढळणाऱ्या दोषी विरुध्द कठोर कार्यवाही करणे आवश्यक असल्याने याकरीता राज्य शासनाचा प्रभावी कायदा अस्तित्वात असणे आवश्यक आहे. याकरीता राज्य शासनाचा नवीन कायदा तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे अभ्यास समिती स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	सदस्यत्वाचा प्रकार
१	प्रधान सचिव - १, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२	प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
३	सचिव (विधि विधान), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
४	आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई	सदस्य
५	अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे	सदस्य सचिव

२.   सदर समिती केंद्र शासनाच्या गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ व सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा २०२१ आणि सरोगसी (नियमन) कायदा २०२१ या कायद्यांचा तसेच अस्तित्वातील अन्य कायद्यांचा अभ्यास करून राज्य शासनास नवीन कायदा तयार करण्याबाबत आवश्यक शिफारशी १५ दिवसात शासनास सादर करतील.

३.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०८०४१७१४१८८५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAILAS
TARACHAND
SALUNKE

Digitally signed by KAILAS TARACHAND SALUNKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=2251A03D4696F35FEB94E0A8547536FA68882BDECAABA93CEE29502D225F6286, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=35C845457FD4B891124529DBD2192A0E21273AD7339A5CA3B170A0E91352CED7, cn=KAILAS TARACHAND SALUNKE
Date: 2026.08.04 18:16:37 +05'30'

(कैलास साळुंके)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव - १, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव (विधि विधान), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
५) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
६) निवड नस्ती (कु.क.२).